महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२२ २२०२१०००५
Email ID adg.trg.office@mahapolice.gov.in

---

क्रमांक. प्रशि/पो.शि.भरती- प्रक्रिया २०२१/१८८/२०२१ /१८८/२०२१/२८० मुंबई दिनांक :-२८/०२/२०२४

विषय :- सन २०२२-२०२३ या वर्षातील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत.

* * * * * *

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २०२२-२०२३ मध्ये **पोलीस शिपाई** संवर्गात रिक्त पदांची माहिती या कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे. सन २०२२-२०२३ ची रिक्त असलेली पदे भरण्याकरिता जाहिरात देण्याबाबतचा विहित नमुना सोबत जोडला आहे. त्यानुसार खालील घटक प्रमुखांनी जाहिरात तयार करुन सदरची जाहिरात **दिनांक ०१.०३.२०२४** ह्या दिवशीच्या वर्तमानपत्रात देण्यात यावी तसे या कार्यालयास ई-ऑफीसद्वारे व महाआयटी विभागाच्या raunak.saraf@mahait.org या ईमेलवर कळविण्यात यावे.

तसेच (कारागृह महानिरीक्षक / उपमहानिरीक्षक यांनी दिलेला रिक्त पदांचा तपशील पोलीस आयुक्त, मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर आणि नागपूर शहर यांनी त्यांच्या जाहिरातीमध्ये नमूद करावा) त्यानुसार कप्पीकृत आरक्षणाचा तपशील सोबत जोडला आहे.

RAJKUMAR MARUTI VHATKAR
Digitally signed by RAJKUMAR MARUTI VHATKAR
Date: 2024.02.28 12:06:02 +05'30'

**(राजकुमार व्हटकर)**
अपर पोलीस महासंचालक
प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई

## <u>वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा नमुना</u>
## <u>- पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३</u>

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदींनुसार पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक (संबंधीत पोलीस घटक कार्यालयाचे नांव नमूद करावे) यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई (संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेकडून भरण्यात येत असलेल्या पदाचा उल्लेख करावा) यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. ह्या बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरिक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधित प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यांत येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमूद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसूचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय,दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्तायादी तयार करण्यांत येईल.**
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारिरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

www.MahaBharti.in